MHPA160003922026

## निशाणी क्र.१ खालील आदेश

अर्जदाराने प्रस्तुत अर्ज, भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ५०३ नुसार, अशोक लिलँड कंपनीचा DOST RLS (BSIV) ज्याचा वाहन नोंदणी क्र. एम एच. १७– बी वाय ४३०३, ज्याचा चेसीस MB1AA22E6KRC74738 व इंजिन क्र. CKH037608P हे वाहन ताब्यात मिळण्याकरिता दाखल केला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, तो वरील नमूद वाहनाचा मालक व ताबेदार आहे. सदरचे वाहन पोलीस स्टेशन, पाथरी यांनी गुन्हा नोंद क्र.१५९/२०२६ कलम ११(१)(ड)(इ)(ज)प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम,१९६० मध्ये जप्त केले आहे. अर्जदार याला त्याच्या व्यापाराच्या कामासाठी वरील नमूद वाहनाची वेळोवेळी गरज पडते. सदर वाहन पोलीस स्टेशन, पाथरी यांनी जप्त केल्यामुळे अर्जदाराला गैरसोय निर्माण झाली आहे. सदर वाहन हे पोलीस स्टेशन पाथरी यांच्या आवारामध्ये बंद अवस्थेत उभे आहे, त्यामुळे त्याचे टायर, इंजिन व इतर तांत्रीक भाग खराब होण्याची दाट शक्यता आहे व त्यामुळे अर्जदाराचे अतोनात नुकसान होईल. म्हणून, अर्जदाराने जप्त वाहन त्याच्या ताब्यात देण्याची विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत प्रकरणी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता व तपासीक अंमलदार यांचे म्हणणे मागविण्यात आले. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी अर्जाच्या पाठीमागे म्हणणे मांडले की, सदर जप्त वाहनामध्ये दोन बैल व पाच वासरे हे दाटी–वाटीने त्यांना त्रास होत असतांना वाहतूक करताना मिळून आलेले आहे. सदर वाहनातील जनावरे हे गोशाळेत असून त्यांच्या चा–यापाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. अर्जदारास जप्त वाहन हे परत केल्यास तो त्याच्या स्वरुपात बदल करु शकतो व अशाच प्रकारचा गून्हा परत करु शकतो. करिता सदर जप्त वाहन हे अर्जदाराच्या ताब्यात देऊ नये. तसेच तपासीक अंमलदार यांनी नि.क्र.०५ वर म्हणणे मांडले की, जप्त वाहनाबाबत योग्य तो आदेश व्हावा, अशी विनंती त्यांनी केली.

०४. अर्जदाराने अर्जाच्या समर्थनार्थ कागदपत्रांची यादी नि.क्र.४ खाली वाहनाचे

नोंदणी प्रमाणपत्र पडताळलेली प्रत, अर्जदाराचे आधार कार्ड पडताळलेली प्रत, अर्जदाराचे वाहन चालवण्याच्या परवान्याची पडताळलेली प्रत, प्रथम खबरी अहवालीची प्रमाणीत प्रत, वाहनाचा विमा, इत्यादींची प्रत दाखल केलेली आहेत.

०५. अर्ज वाचला व अभिलेखावर दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. अर्जदाराकरिता विद्वान विधीज्ञ श्री. एम.टी.अन्सारी व अभियोग पक्षाकरिता विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती आर.एस.सुतार, यांचा युक्तीवाद श्रवण केला.

०६. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, अर्जदार अर्जात नमूद जप्त वाहनाचा नोंदणीकृत मालक असल्याचे दिसून येते. तसेच वाहनाचा विमा असल्याचे देखील दिसून येते. सदरचे वाहन पोलीस स्टेशन, पाथरी यांनी गुन्हा नोंद क्र.१५९/२०२६ मध्ये जप्त असून जप्त वाहन पोलीस स्टेशन पाथरी यांच्या आवारामध्ये एका ठिकाणी उभे आहे. त्यामुळे, जप्त वाहन जर एका ठिकाणी बंद अवस्थेत उभे राहिले तर, वातावरणामध्ये होणा-या बदलामुळे त्याचे टायर, इंजिन व इतर भाग निकामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर वाहन अर्जदाराला त्याच्या व्यापाराच्या कामासाठी आवश्यक आहे. सरकारी अभियोक्ता व तपासीक अंमलदार यांचे म्हणणे लक्षात घेता जप्त वाहन काही अटी व शर्तीवर सोडले जाऊ शकते. अर्जदार जप्त वाहनाचा नोंदणीकृत मालक असल्याने व त्याला असलेली वाहनाची आवश्यकता विचारात घेता, जप्त वाहनाचा अंतरिम ताबा मिळण्यास तो पात्र आहे. म्हणून, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात आला.

०२. अर्जदारांनी रुपये १०,००,०००/- (अक्षरी दहा लाख रुपये) चा सुपुर्तनामा दाखल करावा.

०३. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, पाथरी यांना निर्देश देण्यात येतो की, गुन्हा नोंद क्र.१५९/२०२६, पोलीस स्टेशन, पाथरी या गुन्हयात जप्त करण्यात आलेली अशोक लिलँड कंपनीचा DOST RLS (BSIV) ज्याचा वाहन नोंदणी क्र. एम एच. १७- बी वाय ४३०३, ज्याचा चेसीस MB1AA22E6KRC74738 व इंजिन क्र. CKH037608P हे वाहन खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्जदाराच्या ताब्यात देण्यात यावे.

अ. अर्जदाराने वरील नमूद वाहनाची कोणत्याही प्रकारे ओळख अथवा मॉडेल मध्ये बदल करु नये.

ब. अर्जदाराने न्यायालयाच्या परवानगी शिवाय सदरचे वाहन कोणासही विक्री, बक्षीस अथवा गहाण करु नये किंवा त्यावर कोणताही त्रयस्थ बोजा निर्माण करु नये. तसेच, ज्या ज्या वेळी न्यायालय आदेश करील, त्या त्या वेळी अर्जदाराने सदरचे वाहन गुन्ह्या संबंधाने खटला चालू काळात हजर करावे.

०४. तपासीक अंमलदार यांना पूढे असे ही निर्देश देण्यात येतो की, सदरची वाहने अर्जदाराच्या ताब्यात देतेवेळी त्यांनी सदर वाहनांचा सविस्तर पंचनामा तयार करावा व त्याचे छायाचित्र घ्यावे.

०५. तपासीक अंमलदार यांना आणखी असाही निर्देश देण्यात येतो की, त्यांनी दोषाराप पत्र दाखल करतेवेळी त्यासोबत वाहनांचा पंचनामा व छायाचित्र दाखल करावे.

०६. अर्जदाराने जप्त वाहनाचा सूपूर्तनामा दाखल करावा.

०७. येणे प्रमाणे संबंधितांना कळविण्यात यावे.

स्वाक्षरित/–

दिनांकः– १०.०६.२०२६

**(एम.एस.काझी),**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
**पाथरी.**